नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३६१ | Issue - 361 | वार - रविवार दि. २४ मे २०२६ | Blow- Sunday Date 24 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# अहिल्यानगर जिल्हा डिफेन्स उत्पादनाचे मुख्य हब : मुख्यमंत्री

## ३६५ दिवस पुरतील इतकं उत्पादन, ड्रोन आणि मिसाईल्स; साईंच्या शिर्डीत भक्तीसोबत शक्तीचा नवा प्रकल्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर : अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी हे जगभरात प्रसिद्ध असलेले एक प्रमुख धार्मिक आणि आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र आहे. पण आता भक्तीसोबतच देशाच्या सुरक्षेसाठी शक्तीचा नवा प्रकल्प सुरू झाला आहे. शिर्डीच्या एमआयडीसी (चखऊ) परिसरात २०० एकर जागेवर उभारण्यात आलेल्या भव्य क्षेपणास्त्र संकुल आणि तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे नुकतेच भव्य लोकार्पण करण्यात आले. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि विधान परिषद सभापती राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

कार्यक्रमादरम्यान बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजचा दिवस देशाच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासात ऐतिहासिक आहे. आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'आत्मनिर्भर भारत'चा जो संदेश दिला होता, त्याची यशस्वी अंमलबजावणी आज होताना दिसत आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली देशाने संरक्षण क्षेत्रात इतकी मोठी प्रगती केली आहे की,



आज आपला देश केवळ स्वावलंबी बनला नसून संरक्षण साहित्याचा मोठा निर्यातदार बनला आहे.

पुढे ते म्हणाले की, महाराष्ट्राच्या मातीतील ग्रामीण भागातील युवक गणेश निबे यांनी जे काम इथे उभे केले आहे, ते अत्यंत गौरवास्पद आणि कौतुकास्पद आहे. निबे यांच्याकडे प्रचंड आत्मविश्वास होता आणि याच आत्मविश्वासाच्या बळावर हा भव्य प्रकल्प आज उभा राहिला आहे. त्यांनी या ठिकाणी जी उत्पादने तयार केली आहेत, ती देशाच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या ठिकाणी जे तोफगोळे तयार होणार आहेत, ते खूप महत्त्वाचे काम आहे. वर्षभर या प्रकल्पात उत्पादनाचे काम अखंडपणे सुरू राहील, अशी अजोड तयारी त्यांनी केली आहे. निबे यांनी १५० ते ३०० किलोमीटर अंतरापर्यंत अचूक मारा करणारी क्षेपणास्त्रे निर्माण केली आहेत. जर देशावर युद्धाची वेळ आली, तर ३६० ते ३६५ दिवस सलग दारूगोळा पुरवण्याची क्षमता या एकाच प्रकल्पात आहे. यासोबतच शत्रूला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी अत्यंत सूक्ष्म पद्धतीने गाईड केलेले अत्याधुनिक ड्रोन देखील येथे तयार होत आहेत. ऑपरेशन सिंदूर दरम्यान आपल्याला आत्मनिर्भर भारताचा खरा प्रत्यय आला. पाकिस्तानने अनेक देशांच्या मदतीने भारताच्या सीमेवर अनेक ड्रोन पाठवले होते. मात्र, आपल्या शूर सैनिकांनी त्या सर्व ड्रोनना हवेतच नष्ट करून पाकिस्तानचे मनसुबे उधळून लावले.

आता आपला अहिल्यानगर जिल्हा हा डिफेन्स उत्पादनाचे मुख्य हब बनला आहे. केवळ इथेच नाही, तर नाशिक, पुणे आणि नागपूर मध्ये देखील असाच भव्य 'डिफेन्स कॉरिडॉर' तयार केला जाणार आहे. या प्रकल्पांना संरक्षणमंत्र्यांनी देखील मंजुरी दिली आहे. गणेश निबे यांना मी ग्वाही देतो की, तुम्हाला महाराष्ट्रात जिथे पाहिजे तिथे सरकार जमीन देईल. आपल्याला आता महाराष्ट्रात संरक्षण क्षेत्रात खूप मोठे काम करायचे आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

फडणवीसांचा 'वंदे भारत'ने प्रवास

या कार्यक्रमासाठी येताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणताही खाजगी चॉपर, विमान किंवा गाड्यांचा मोठा ताफा न वापरता मुंबई ते शिर्डी असा प्रवास 'वंदे भारत एक्सप्रेस'ने केला. पंतप्रधानांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत त्यांनी हा निर्णय घेतला, ज्याची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे.

# विदर्भातील ब्रह्मपुरीसह जगातील ५० सर्वात उष्ण शहरे फक्त भारतात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशाचा बहुतांश भाग तीव्र उष्णता आणि उष्णतेच्या लाटेने त्रस्त आहे. तेलंगणामध्ये आतापर्यंत उष्णतेच्या लाटेमुळे १६ मृत्यूंची नोंद झाली आहे. राज्याचे महसूल मंत्री श्रीनिवास रेड्डी यांनी ही माहिती दिली. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि राजस्थानसह उत्तर, पश्चिम आणि मध्य भारतातील ११ राज्यांमध्ये तापमान ४०ओउ ते ४७ओउ पर्यंत होते. या ११ राज्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशातील बांदा येथे ४७ओउ आणि मध्य प्रदेशातील नौगाव येथे ४६.८ओउ या सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. पुढील दोन दिवस उष्णतेपासून दिलासा मिळण्याची कोणतीही आशा नाही.

खासगी एजन्सी टख नुसार, शुक्रवारी जगातील ५० सर्वात उष्ण शहरांच्या यादीतील सर्व शहरे भारतात होती. उत्तर प्रदेश, बिहार, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि हरियाणातील अनेक शहरांमध्ये दुपारपूर्वी तापमान ४२ ते ४४ओउ पर्यंत पोहोचले. सर्वात उष्ण शहरांच्या यादीत एकट्या उत्तर प्रदेशातील २२ शहरांचा समावेश होता. सकाळी १०:५० वाजता, ओडिशातील बलांगीर हे ४५ओउ तापमानासह सर्वात उष्ण शहर होते. दुपारपर्यंत, विदर्भातील ब्रह्मपुरी येथे देशातील सर्वाधिक ४७.२ओउ तापमानाची नोंद झाली. दुपारी ३ वाजता, जगातील २२ सर्वात उष्ण शहरांमध्ये पारा ४७ओउ च्या वर गेला होता. ही सर्व शहरे भारतात होती.



बिहारमध्ये वीज पडून ४ जणांचा मृत्यू

शुक्रवारी बिहारमधील अररिया, जहानाबाद, नालंदा आणि सुपौल येथे पाऊस पडला. वीज पडून चार जणांचा मृत्यू झाला. जम्मू आणि काश्मीरमधील झोजिला आणि उत्तराखंडमधील चमोली-पिठोरगड येथे हिमवृष्टी झाली. हवामान विभागाच्या माहितीनुसार, एक चक्रीवादळी प्रणाली पाकिस्तानवर आणि दुसरी बिहारच्या आसपास आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्रही आहे. यामुळे आज अनेक राज्यांमध्ये हवामानात बदल होऊ शकतो. दिल्ली, पश्चिम बंगाल, अंदमान आणि निकोबार बेटे आणि लक्षद्वीपमध्ये पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्र आणि गोव्यात पावसाची शक्यता आहे.

पुढील दोन दिवसांचा हवामान अंदाज

२४ मे: बिहार, दिल्ली, हरियाणा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, पंजाब, राजस्थान आणि तेलंगणामध्ये उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. पश्चिम बंगाल, ओडिशा आणि तामिळनाडूच्या काही भागांमध्ये उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. केरळ, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि झारखंडमध्ये ताशी ५०-६० किमी वेगाच्या वाऱ्यासह मेघगर्जनेसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

२५ मे: दिल्ली, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये उष्णता आणि उष्णतेची लाट राहील; आकाश निरभ्र आणि सूर्यप्रकाशित राहील. दरम्यान, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, आसाम आणि मेघालय यांसारख्या दक्षिण भारतीय राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता आहे.

# मोसमी पाऊस ६ जूनला कोकणात, ७ जूनला पुण्यात पोहोचणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पावसाचा प्रवास असाच सुसाट राहिल्यास ५ जूनला गोव्यात दाखल होण्याची शक्यता आहे. ६ जूनला कोकणात आणि ७ जूनला पुण्यात पावसाचे आगमन होण्याची शक्यता आहे. आता पाऊस महाराष्ट्रात नेमका कधी दाखल होणार? याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

भीषण उकाड्याने आणि वाढत्या तापमानाने हैराण झालेल्या नागरिकांसाठी पावसाच्या आगमनाची दिलासादायक अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या ताज्या माहितीनुसार, शनिवारी नैऋत्य मान्सूनने नैऋत्य अरबी समुद्र, आग्नेय अरबी समुद्र, कोमोरिन परिसर तसेच बंगालच्या



उपसागराच्या आणखी काही भागांत यशस्वी प्रगती केली आहे. पुढील ३ ते ४ दिवसांत मान्सून आणखी वेगाने पुढे सरकण्यासाठी अत्यंत अनुकूल आणि पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे. या आगामी काळात नैऋत्य व आग्नेय अरबी समुद्र, कोमोरिन क्षेत्र, बंगालच्या उपसागराचा आणखी मोठा भाग आणि उर्वरित अंदमान समुद्र मान्सूनच्या कक्षेत येण्याची दाट शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. सामान्यत: १ जूनच्या सुमारास पोहोचणारा मान्सून यंदा २६ मे रोजीच केरळ किनारपट्टीवर धडकू शकतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने मान्सूनचा वेग वाढला आहे. विशेष म्हणजे, यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही. त्यामुळे मान्सूनच्या प्रवासात कोणताही मोठा अडथळा येणार नसून तो सुरळीत पुढे सरकणार असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

# राज्यसभा पोटनिवडणुकीसाठी १८ जूनला मतदान

मुंबई : राज्यसभा सदस्य सुनेत्रा अजित पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. सुनेत्रा पवार यांनी ६ मे २०२६ रोजी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. या जागेचा कार्यकाळ ७ जुलै २०२८ पर्यंत आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, १ जून २०२६ पासून निवडणूक प्रक्रिया सुरू होणार असून १८ जून २०२६ रोजी मतदान आणि त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार ८ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. ९ जून रोजी अर्जांची छाननी होईल, तर ११ जून ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असेल. १८ जून रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडेल. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता मतमोजणी करण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाने २० जून २०२६ पर्यंत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

केंद्र शासनाच्या योजनेशी सुसंगत उपक्रम

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

# प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्यात येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील येरवडा, ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करणे हा केवळ आरोग्य व्यवस्थेचा विस्तार नसून, गुणवत्तापूर्ण उपचार, संशोधन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने टाकलेला दूरदर्शी आणि मानवकेंद्री पाऊल आहे. यामुळे समाजातील वंचित घटकांपर्यंत अधिक सक्षम, सुलभ आणि आधुनिक मानसिक आरोग्य सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प अधिक बळकट होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील येरवडा (पुणे), ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील चार प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालये समाजातील विशेषतः वंचित घटकांना मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा पुरवत आहेत. बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवांद्वारे ही रुग्णालये हजारो रुग्णांना उपचार देत असून, सुमारे ५७०० खाटांची सुविधा उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा व मनुष्यबळ आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने या रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आणला आहे. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात दर्जेदार उपचार सेवांसोबतच शिक्षण आणि संशोधनालाही चालना मिळणार आहे.

केंद्र शासनाच्या मॅनपॉवर डेव्हलपमेंट स्कीम अंतर्गत, स्ट्रेंथनिंग पीजी डिपार्टमेंट इन मेंटल हेल्थ स्पेशालिटिज (स्कीम बी) या योजनेनुसार मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत (एनएमएचपी) १२व्या पंचवार्षिक योजनेपासून या दिशेने विशेष भर देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी आधीपासून पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, अशा प्रादेशिक रुग्णालयांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

शासन निर्णय आणि अभ्यासक्रमांची सुरुवात




राज्य शासनाने १६ सप्टेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करून खालील अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे:

एम.डी. सायकिॲट्री

एम.फिल क्लिनिकल सायकॉलॉजी

एम.फिल सायकियाट्रिक सोशल वर्क

डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग

हे अभ्यासक्रम प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे, पुणे (येरवडा) आणि नागपूर येथे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

नागपूर येथे एम.डी. सायकिॲट्रीला सुरुवात

प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून एम.डी. सायकिॲट्री अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील अध्यापकांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरू झाला असून, दरवर्षी ४ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात आहे. आजपर्यंत १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, त्यापैकी २ विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

नर्सिंग क्षेत्रातही प्रगती

प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे व पुणे येथे डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग अभ्यासक्रम २०२२-२३ पासून सुरू करण्यात आला आहे.प्रत्येक ठिकाणी दरवर्षी २० विद्यार्थी प्रवेश घेत आहेत.आतापर्यंत ठाणे येथून ५९ आणि पुणे येथून ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित नर्सिंग कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढण्यास मदत होत आहे.

या चारही प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे पूर्णतः अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर केल्यामुळे पुढील फायदे अपेक्षित आहेत. रुग्णांना अधिक दर्जेदार आणि विशेषज्ज्ञ उपचार सेवा. मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांची संख्या वाढ. संशोधन आणि नवोपक्रमाला चालना. ग्रामीण व वंचित भागांपर्यंत गुणवत्तापूर्ण मानसिक आरोग्य सेवा विस्तार होणार.

महाराष्ट्रातील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर हा केवळ आरोग्य क्षेत्रातील नव्हे तर शिक्षण आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीनेही एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून राबविण्यात येणारा हा उपक्रम राज्यातील मानसिक आरोग्य सेवांना नवे बळ देणारा ठरेल.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी एआय आधारित एकात्मिक 'कमांड अँड कंट्रोल सिस्टीम' विकसित करण्यासाठी कार्यवाही सुरू करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील मॉन्सूनपूर्व तयारीचा आढावा घेताना सर्व विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडून आपत्तीचे सौम्यीकरण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. आपत्ती व्यवस्थापनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित एकात्मिक 'कमांड अँड कंट्रोल सिस्टीम' विकसित करण्यासाठी कार्यवाही सुरू केली जावी, असेही त्यांनी सांगितले.




मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मान्सून पूर्व तयारी व आपत्ती व्यवस्थापनाबाबत आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल व सर्व महसूली विभागांचे विभागीय आयुक्त दूरदृश्य प्रणाली द्वारे सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्रत्येक वर्षी मॉन्सून नवीन आव्हाने घेऊन येतो. त्यामुळे मागील अनुभवांच्या आधारे अधिक सक्षम तयारी करणे आवश्यक आहे. केवळ कागदावरील नियोजन न ठेवता सर्व विभागांनी मानक कार्यपद्धतीची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. यंत्रणांचा तातडीचा प्रतिसाद, वेळेत इशारे आणि प्रभावित नागरिकांपर्यंत जलद मदत पोहोचणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील १५ दिवसांत सर्व विभागांनी तयारीची पुन्हा पडताळणी करून त्रुटी दूर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

मंत्रालय, पोलीस, महानगरपालिका व विविध नियंत्रण कक्षांचे एकत्रीकरण करून एकात्मिक प्रतिसाद प्रणाली उभारण्याचा मानस व्यक्त करताना, या मॉन्सूनमध्ये सर्व यंत्रणांनी सतर्क राहून नागरिकांना जास्तीत जास्त दिलासा द्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध शासकीय यंत्रणांच्या अधिकाऱ्यांचा बैठकीत सहभाग

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल एनडीआरएफ, सैन्य दलाच्या तिन्ही कमांडचे महाराष्ट्रातील प्रमुख, तटरक्षक दल रेल्वे दूरसंचार विभाग, भारतीय हवामान शास्त्र विभाग, विविध विभागांचे अधिकारी, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई महानगरपालिका आणि पोलीस विभागाचे प्रमुख अधिकारी बैठकीस उपस्थित होते. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, महानगर पालिका, पोलीस, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणातील प्रमुख अधिकारी दूरदृश्य प्रणाली द्वारे सहभागी झाले होते.

आपत्तीमध्ये राज्य शासनाची तत्पर मदत

आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन म्हणाले, पावसाळ्यामध्ये धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गामुळे नदीकाठच्या गावात पूर निर्माण होतो या परिस्थितीत समन्वय नसल्यास मोठी हानी होते. यादृष्टीने संबंधित विभागांमध्ये योग्य समन्वय आणि सतर्कता महत्त्वाचे आहे. कमजोर पुलांमुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट व त्यावर कार्यवाही करताना धोकादायक पुलांवरील वाहतूक देखील बंद केली जावी. आवश्यक उपाययोजना लागू करण्यात याव्यात, असे मंत्री महाजन म्हणाले.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील म्हणाले, शेतकऱ्यांची शेती, घर, पशुधन व मनुष्यहानीचे पंचनामे पूर्ण करून विशेष पॅकेज मंजूर करण्यात आले. खरीप हंगामासाठी प्रति हेक्टर १० हजार रुपये मदत, वाहून गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार रुपये भरपाई तसेच रोजगार हमी योजनेतून ₹५ हजार रुपये पर्यंत अनुदान देण्यात आले. अतिवृष्टीनंतर राज्य शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने मदत उपाययोजना राबवल्या.

सुमारे ११ हजार विहिरींसाठी प्रथमच प्रति विहीर ३० हजार रुपये नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली. मदतीची मर्यादा २ हेक्टरवरून ३ हेक्टरपर्यंत वाढविण्यात आली. राज्यातील १.०६ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे १६,२२४ कोटी रुपये जमा करण्यात आले. एल निनोच्या पार्श्वभूमीवर पाणी टँकर, चारा छावण्या व अन्य उपाययोजनांसाठी मदत व पुनर्वसन विभाग सज्ज असल्याचे मंत्री मकरंद पाटील यांनी सांगितले.

मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. ते म्हणाले, पूरग्रस्त गावांमध्ये आपत्तीपूर्व तयारी, स्थानिक बचाव पथके आणि धोकादायक भागांचे मॅपिंग करण्याची गरज आहे. पूर येण्याची शक्यता असलेल्या गावांमध्ये आधीच रेस्क्यू टीम, निवारा व आवश्यक सुविधा उपलब्ध करण्याची सूचना यावेळी करण्यात आली. मध्यप्रदेशातून होणाऱ्या धरणातील पाणी विसर्गाबाबत पूर्वसूचना प्रणाली अधिक सक्षम करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली आहे. नदी-नाल्यांच्या काठावर बांधलेल्या धोकादायक घरांचे पुनर्वसन आणि प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याची गरज राज्यमंत्री ड जयस्वाल यांनी व्यक्त केली.

मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापनासाठी राज्य यंत्रणा सज्ज ; सादरीकरणातून माहिती

केंद्र व राज्य शासनाच्या विविध शासकीय यंत्रणांची मान्सूनपूर्व तयारीबाबत सादरीकरणातून मुख्यमंत्री फडणवीस यांना माहिती दिली. आगामी मान्सून हंगामाच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागामार्फत राज्य शासनाच्या पूर्वतयारी आणि आपत्ती प्रतिसाद व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. यावेळी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण यांनी सादरीकरण केले.

भारतीय लष्कर, नौदल, वायुदल, तटरक्षक दल तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांच्याशी समन्वय वाढविण्यात येत असून, आपत्कालीन परिस्थितीसाठी विविध यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. वेस्टर्न नौदल कमांडकडून मोठी व लहान जहाजे, हेलिकॉप्टर व इंटरसेप्टर क्राफ्ट उपलब्ध ठेवण्यात आले आहेत, तर वायुदलाकडून एअर म्ब्युलन्स आणि एअर कार्गो सुविधा सज्ज आहेत. राज्यात एसडीआरएफच्या १० टीम कार्यरत असून आणखी दोन टीमना मान्यता देण्यात आली आहे.

मुंबईत अतिवृष्टी आणि पाणी साचणाऱ्या ठिकाणांसाठी ४३ मोठे पंपिंग स्टेशन कार्यरत करण्यात आले असून, स्मार्ट पंप मॉनिटरिंग प्रणाली सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, कोकण व घाट विभागातील रेल्वेमार्गांवर सुरक्षेच्या दृष्टीने गाड्यांचा वेग नियंत्रित ठेवण्यात येणार आहे. रुग्णालयांमध्ये ३ हजार खाटा राखीव ठेवण्यात आल्या असून, आपत्ती व्यवस्थापन केंद्रे २४÷७ कार्यरत राहणार आहेत.

जिल्हास्तरावर करण्यात आलेल्या मान्सूनपूर्व तयारीचा आढावा

विभागीय आयुक्त कोकण, पुणे, नागपूर, नाशिक, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर यांनी यावेळी जिल्हास्तरावर करण्यात आलेल्या मान्सूनपूर्व तयारीचा आढावा सादर केला. कोकण विभागातील ९३९ गावे दरडप्रवण असल्याने संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी विशेष प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. सावित्री व वशिष्ठी नद्यांमधील पूरस्थितीचा पूर्वानुभव लक्षात घेऊन नदीपात्रातील गाळ काढण्याची कामे करण्यात आली आहेत.

मुंबई-गोवा तसेच इतर प्रमुख राष्ट्रीय महामार्गांवर पावसाळ्यात होणारे अपघात टाळण्यासाठी विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. पावसाळी पर्यटनस्थळी उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्तींच्या पार्श्वभूमीवरही सुरक्षा उपाय वाढविण्यात आले आहेत. नंदुरबार आणि मेळघाटातील आदिवासी व दुर्गम भागांमध्ये पावसाळ्यात आरोग्य सुविधा खंडित होऊ नयेत यासाठी प्रशासनाकडून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

# गडचिरोली ते मुंबई उद्योग, पायाभूत सुविधा आणि पर्यावरणपूरक विकासाला गती : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**■ महाराष्ट्राची १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल**

**■ मुंबई ते सुरजागड विकासाचा महामार्ग**

मुंबई : विकसित भारत २०४७ च्या दिशेने वाटचाल करताना महाराष्ट्र वेगाने पुढे जात असून, मुंबईपासून गडचिरोलीतील सुरजागडपर्यंत विकासाचा नवा एक्सप्रेसवे उभारण्यात येणार आहे. उद्योग, आधुनिक पायाभूत सुविधा, वेगवान दळणवळण, कौशल्य विकास, गृहनिर्माण आणि पर्यावरणपूरक प्रकल्पांच्या माध्यमातून राज्याचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. या व्यापक विकास आराखड्यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

दि हिंदू कॉन्क्लेव्ह' मध्ये मुंबई ते सुरजागड - समृद्धीचा महामार्ग या विषयावर बोलताना त्यांनी राज्यातील पायाभूत सुविधा, उद्योग, गृहनिर्माण, परिवहन, पर्यावरण आणि गडचिरोलीसारख्या दुर्गम भागांतील विकासाचा विस्तृत आढावा मांडला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबई हे देशाचे आर्थिक केंद्र आणि गडचिरोलीसारखे दुर्गम भाग हे नैसर्गिक व औद्योगिक संपत्तीने समृद्ध असल्याचे सांगत त्यांनी राज्यातील विकास केवळ महानगरांपुरता मर्यादित न ठेवता तो ग्रामीण, आदिवासी आणि मागास भागांपर्यंत पोहोचवण्यावर शासनाचा भर असल्याचे स्पष्ट केले. समृद्धी महामार्ग, मेट्रो जाळे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर, स्टील प्रकल्प आणि कौशल्य विकास केंद्रांमुळे राज्यात रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळाली असून कोस्ट टू फॉरेस्ट असा विकासाचा प्रवास गेल्या काही वर्षांत घडवून आणला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, गडचिरोलीचा पालकमंत्री असताना नक्षलग्रस्त भागांमध्ये जाऊन स्थानिक नागरिक, आदिवासी समाज आणि पोलिसांशी संवाद साधत विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. रक्षाबंधन आणि दिवाळीसारखे सणही जवानांसोबत गडचिरोलीत साजरे केल्याचे सांगत त्यांनी, दुर्गम भागाचा विकास करायचा असेल, तर तेथील समाजाशी भावनिक नाते जोडणे आवश्यक असते असे सांगितले.

पायाभूत सुविधांसह रोजगारनिर्मितीवर भर

गडचिरोलीत रस्ते, पूल, रुग्णवाहिका, ऑक्सिजन प्लांट आणि प्रशासनासाठी आवश्यक सुविधा उभारण्यात आल्या आहेत. मात्र, केवळ सुविधा नव्हे तर उद्योग आणि रोजगार निर्माण करणे ही सरकारची प्रमुख भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

टाटा टेक्नॉलॉजी कौशल्य विकास केंद्र

टाटा समूहासोबत चर्चा करून स्थानिक युवकांसाठी कौशल्य विकासाची संकल्पना पुढे आणण्यात आली. त्यातून १७० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून 'टाटा टेक्नॉलॉजी कौशल्य विकास केंद्र' सुरू करण्यात आले. गडचिरोलीत अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त हे केंद्र दरवर्षी सुमारे ४,८०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत असून भविष्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि उद्योजक निर्माण होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नक्षलवादावर नियंत्रण

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वामुळे नक्षलवाद मोठ्या प्रमाणात नियंत्रणात आला असून गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त भागात विकासाची नवी दिशा निर्माण झाली आहे. आज जिल्ह्यात उद्योग, रस्ते, इंटरनेट सुविधा, आरोग्य सेवा आणि शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असून दुर्गम भाग मुख्य प्रवाहाशी जोडले जात आहेत.

गडचिरोलीत हजारो कोटींची गुंतवणूक

कोनसरी येथे लॉयड मेटल्स लिमिटेडसोबत २० हजार कोटी रुपयांच्या 'इंटिग्रेटेड स्टील प्लांट'साठी सामंजस्य करार करण्यात आला असून, त्यातून सुमारे १० हजार रोजगार निर्माण होणार आहेत. याशिवाय सुरजागड इस्पातच्या माध्यमातून आणखी २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत असून सुमारे ८ हजार तरुणांना रोजगार मिळणार आहे.

समृद्धी महामार्गाशी सुरजागडची जोडणी

सुरजागड परिसरातील खनिज वाहतुकीसाठी ८५ किलोमीटरच्या ग्रीनफिल्ड रस्ते प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. हा मार्ग समृद्धी महामार्गाशी जोडण्यात येणार असून मुंबई ते गडचिरोली प्रवास ९ ते १० तासांमध्ये पूर्ण होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच गडचिरोलीत नवीन विमानतळ उभारण्यासही मंजुरी मिळाल्याची माहिती त्यांनी दिली.

'डिस्ट्रिक्ट इन्व्हेस्टमेंट समिट'मधून मोठी रोजगारनिर्मिती

गडचिरोलीत आयोजित 'डिस्ट्रिक्ट इन्व्हेस्टमेंट समिट-२०२५'मध्ये १२ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. यामधून १७,४३१ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि सुमारे १.४४ लाख रोजगार निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई आणि एमएमआरला जागतिक आर्थिक केंद्र बनवण्याचा संकल्प

मुंबई हे देशाचे 'ग्रोथ इंजिन' असून संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशाला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक आर्थिक क्षेत्र बनवण्याचे सरकारचे ध्येय आहे.

नीती आयोगाने दिलेल्या रोडमॅपनुसार मुंबईचा जीडीपी दुप्पट करण्यासाठी आणि मुंबईला 'ग्लोबल फिनटेक कॅपिटल' बनवण्यासाठी राज्य सरकार वेगाने काम करत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

४ लाख कोटींच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती

एमएमआरमध्ये सध्या जवळपास ४ लाख कोटी रुपयांचे पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू आहेत. अटल सेतू, कोस्टल रोड, बुलेट ट्रेन, मेट्रो विस्तार, दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे, मेट्रो लाईन-३ आणि वाढवण बंदर हे राज्याच्या भविष्यासाठी गेमचेंजर प्रकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

'६० मिनिटांची मुंबई' हे लक्ष्य

मुंबईतील वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट सिस्टीम विकसित केली जात आहे. मुंबईच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत ६० मिनिटांत पोहोचता आले पाहिजे, हे लक्ष्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एमएमआरमध्ये ३३७ किलोमीटरचे मेट्रो नेटवर्क उभारले जात असून मेट्रो लाईन्स २बी, ४, ५, ६, ७ए, ९ आणि १२ मुळे शहरी वाहतुकीत मोठा बदल होणार आहे.

सॅटेलाईट शहरांना स्वयंपूर्ण आर्थिक केंद्र बनवणार

कल्याणला लॉजिस्टिक्स हब, डोंबिवलीला नॉलेज आणि सर्व्हिस सेक्टर हब, अंबरनाथला औद्योगिक आणि एमएसएमई हब तर बदलापूरला शाश्वत नागरी विकासाचे मॉडेल बनवले जात आहे. सॅटेलाईट शहरांना केवळ निवासी विस्तार न ठेवता रोजगार, उद्योग आणि आधुनिक सुविधांनी युक्त स्वयंपूर्ण आर्थिक केंद्र बनवण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

गृहनिर्माण क्षेत्रात मोठे बदल

मुंबईत १२ लाख आणि एमएमआरमध्ये २० लाख घरांची गरज लक्षात घेऊन सरकारने १७ वर्षांनंतर नवीन गृहनिर्माण धोरण लागू केले आहे. माय होम - माय राईट या संकल्पनेतून २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटांसाठी ३५ लाख घरे उभारण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

डिजिटल हाऊसिंग पोर्टल आणि क्लस्टर पुनर्विकास

एआय आधारित केंद्रीकृत डिजिटल हाऊसिंग पोर्टल विकसित करण्यात येत असून, त्यामध्ये जिओ-टॅगिंग, लँड बँक, महारेरा, महाभूलेख आणि पीएम गतिशक्ती यांचे एकत्रीकरण करण्यात येणार आहे. क्लस्टर रीडेव्हलपमेंट आणि पुनर्विकास प्रकल्पांना प्राधान्य देत प्रलंबित प्रकल्पांना गती देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

'स्लम फ्री' मुंबईसाठी विशेष अभियान

'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान'च्या माध्यमातून मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मोहीम राबवली जात आहे. नेत्रम तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उपग्रह डेटा, जीआयएस मॅपिंग आणि डिजिटल पाळत ठेवून नवीन अतिक्रमणे रोखली जाणार आहेत. धारावी पुनर्विकास हा जगातील सर्वात मोठ्या आधुनिक पुनर्विकास प्रकल्पांपैकी एक ठरणार असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पात्र आणि अपात्र नागरिकांसाठी स्वतंत्र गृहनिर्माण योजना राबवल्या जाणार असल्याचे स्पष्ट केले.

पर्यावरणपूरक विकासावर भर

समृद्धी महामार्ग, कोस्टल रोड, मुंबई-पुणे मिसिंग लिंक आणि ठाणे-बोरीवली टनेल यांसारख्या प्रकल्पांमध्ये पर्यावरणीय निकषांचे काटेकोर पालन करण्यात आले आहे.

सेंट्रल पार्क आणि नमो गार्डन्स

महालक्ष्मी रेसकोर्स येथे २९५ एकरांचे सेंट्रल पार्क विकसित केले जात असून ते देशातील सर्वात मोठ्या शहरी हरित क्षेत्रांपैकी एक असेल. ठाण्यात २५ एकरांचे 'नमो ग्रँड सेंट्रल पार्क' विकसित करण्यात आले आहे. याशिवाय राज्यभरात ३९४ 'नमो गार्डन्स' उभारले जात आहेत.

हवामान बदलांशी लढण्यासाठी विशेष उपाययोजना

पूर नियंत्रणासाठी स्टॉर्म वॉटर ड्रेनेज, पंपिंग स्टेशन, आयफ्लोज प्रणाली, डिवॉटरिंग पंप आणि मिठी नदी सुधारणा प्रकल्प राबवले जात आहेत. खारफुटी आणि पाणथळ क्षेत्रांचे संवर्धन करत क्लायमेट रेझिलियन्स प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पाचा भाग बनवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राच्या संतुलित आणि सर्वसमावेशक विकासाचा दृष्टिकोन मांडला. मुंबईसारख्या आर्थिक केंद्रासोबतच गडचिरोलीसारख्या दुर्गम भागांनाही उद्योग, रोजगार, रस्ते, शिक्षण आणि आधुनिक सुविधांशी जोडण्याचे काम सरकार करत असल्याचे त्यांनी सांगितले. विकासाच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक घटकाला मुख्य प्रवाहात आणून महाराष्ट्राला देशाच्या प्रगतीचे नेतृत्व करणारे राज्य बनविण्याचा शासनाचा संकल्प असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# प्रशिक्षणातून कार्यकर्त्यांना संघटन बळकटीची नवी दिशा : मा.खा. निंबाळकर

## भाजपा सोलापूर ग्रामीणच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान २०२६ ला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील सुरी इंजिनिअरिंग कॉलेज गोपाकृती भारतीय जनता पार्टी सोला-पूर ग्रामीण आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान २०२६ कार्यक्रम उस्फुर्तपणे वातावरणात पार पडला प्रदेश सचिव आमदार रामभाऊ सातपुते तुमच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या प्रशिक्षण वर्गात संघटन मजबुती, विचारधारा, बूथ व्यवस्थापन , सोशल मीडिया, कार्यविस्तार सर आणि देशासमोरील आव्हाने अशा विविध विषयांवर मान्यवरांनी सखोल मार्गदर्शन केले दरम्यान प्रशिक्षणातून कार्यकर्त्यांना संघटना बळकटीची नवी दिशा मिळेल असा विश्वास माजी खा-सदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी व्यक्त केल्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून प्रशिक्षण वर्गाची सुरुवात करण्यात आली यावेळी भाजप पदाधिकारी जिल्ह्यातील विविध मंडळाचे कार्यकर्ते बूथ प्रमुख एक प्रतिनिधी तसेच युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित




होते.

मा श्री पुनीतजी जोशी यांनी विकास संगोपन आणि जबाबदारी जाणीव या विषयावर मार्गदर्शन करत कार्यकर्त्यांना समाजाशी सतत संपर्क ठेवून जबाबदारीने संघटना कार्य करावी असे सांगितले त्यांनी विकास कामाची माहिती सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे ही आव्हान केले यावेळी मा श्री महेरदी महेश पाटणे यांनी एस आय आर विषयावर मार्गदर्शन करत भूत सरावन मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेची माहिती दिली बोगस मतदारांची नावे कमी करणे पात्र मतदाराची नोंदणी करणे व मतदार यादी अधिक उपाध्यक्ष करण्यासाठी बीएलए एक यांनी प्रक्रिया पणे काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपल्या बूथवर जबाबदारीने काम करून संघटना अधिक सक्षम करावी असेही त्यांनी सांगितले.

पश्चिम महाराष्ट्र विभागीय संवादक मा श्री योगेशजी वाचन यांनी बुध व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करत प्रत्येकी भूत हा पक्षाचा मजबूत पाया असल्याचे सांगितले होते. नेहा नियोजन मतदार संपर्क कार्यकर्त्यांमधील समन्वय आणि निवडणूक व्यवस्थापन यावर त्यांनी विशेष भर दिला व तसेच महाराष्ट्र राज्य ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष आमदार मा श्री योगेशजी यांना टिळेकर यांनी कार्यविस्तार या विषयावर मार्गदर्शन करत भाजप विचारधारा गावागावात पोहोचवण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी सक्रिय भूमिका घ्यावी असे सांगितले संघटन वाढीसाठी नव्या कार्यकर्त्यांना जोडण्याची आव्हाने त्यांनी केली.

पंडित दिद्या उपाध्य प्रशिक्षण संयोजक तथा जिल्हा सर्किटणीस मा श्री सचिनजी शिंदे यांनी विचार परिवार या विषयावर मार्गदर्शन भाजप केवळ राजकीय संघटना नसून राष्ट्रहिताची विचारधारा असल्याची सांगितले कार्यकर्त्यांनी वैचारिक बांधिलकी जपत समाजात काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली सोलापूर ग्रामीण माढा जिल्हा प्रभारी मा श्री संजय जगताप साहेब यांनी प्रशिक्षण वर्गात भेट देऊन संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेतला व त्यांनी विविध सत्रांची माहिती घेत कार्यकर्त्यांशी संवाद साधला व प्रशिक्षण वर्गाची कौतुक केली.

श्री भारत जी अहमदापुरे यांनी देशासमोरील आव्हाने या विषयावर मार्गदर्शन करत राष्ट्रीय सुरक्षेपा-सून आर्थिक विकासापर्यंत विविध मुद्द्यावर विचार मांडले व बदलत्या सामाजिक आणि राजकीय परिस्थिती कार्यकर्त्यांनी सजग राहून जनतेमध्ये सकारात्मक संदेश पोहोचवला असे त्यांनी सांगितले.

मा श्री अनिकेत जी निकम यांनी सोशल मीडिया आणि नमो ॲप या विषयावर मार्गदर्शन करत डिजिटल माध्यमाचे वाढते महत्त्व स्पष्ट केले व सोशल मीडियाच्या माध्यमातून शासनाच्या योजना आणि पक्षा-ची भूमिका प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवण्याची आव्हान त्यांनी केले व नमो ॲप या प्रभावी वापर करून कार्यकर्त्यांनी संघटनाची सातत्याने जोडलेली राहावे असेही त्यांनी सांगितले मा श्री सुरेश जी हवनकर यांनी भाजपचा इतिहास या विषयावर मार्गदर्शन करत भारतीय जनता पक्षाचे स्थापनेपासून आजपर्यंतच्या प्रवासाचा आढावा घेतला व राष्ट्रहित संघटनान शक्ती आणि विचारधारा यावर भाजप उभी असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रशिक्षण वर्गाचा निरोप समारंभ माढा लोकसभा मतदारसंघाची लोकप्रिय पाणीदार माजी खासदार मा श्री रणजीतसिंह दादा नाईक निंबाळकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद अध्यक्ष श्री दीपक जी वैद्य यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षण वर्ग उत्साहात पार पडला व त्यांनी कार्यकर्त्यांना आगामी काळात अधिक जोमाने संघटन कार्य करण्याचे आवाहन केले.

कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणामुळे पक्ष अधिक मजबूत होईल असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला कार्यक्रमाचे आभार जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य सभापती तथा भाजप सोलापूर जिल्हा अध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांनी मानले.

संपूर्ण कार्यक्रमात उत्साह पूर्ण वा-तावरणात पाहायला मिळाला व विविध विषयावरील १७ मुळे कार्यकर्त्यांना संघटना निवडणूक व्यवस्थापन डिजिटल प्रचार आणि वैचारिक बांधिलकी याविषयी सखोल माहिती मिळाली व कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान संयोजक श्री सचिन शिंदे सुयोजक श्री दत्तात्रय जाधव तसेच सर्व आयोजक समिती यांची सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले.

# पंढरपूर तालुका पोलिसांची अवैध वाळूविरुद्ध मोठी कारवाई; ४७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका पोलिसांनी अवैद्य वाळू माफिया विरुद्ध मोठी कारवाई केलेली असून माननीय सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलिसांनी शेगाव धुमाळ गावात एक टेम्पो गाडी एक ट्रॅक्टर वाळू उपसा करण्यासाठी लागणारी यारी एकूण किमान किंमत अकरा लाख ५० हजार रुपये तसेच आंबे गावातून एक लाख २५ ब्रास वाळूचा साठा किंमत रुपये सात लाख ५० हजार त्याप्रमाणे मौजे आंबेगावला एक टिपर किमान २८ लाख रुपये त्यामध्ये पाच पाच वाळू किंमत तीस हजार रुपये असा एकूण ४७ लाख रुपये मुद्देमाल त्यामध्ये एक टिपर एक १८ टेम्पो एक ट्रॅक्टर विकून १३० ब्रास वाळू असा एकूण किंमत रुपये ४७ लाख रुपये चा वाहने व वाळूसाठा पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून मोठी कारवाई केली आहे पंढरपूर तालुका पोलिसांनी टेम्पो ट्रॅक्टर यांची चालक आणि मालक यांच्या पळसाठा करणारे यांच्या आरोपाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात करण्याची कारवाई चालू आहे. सद-रची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी साहेब माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री विजय कबाडे साहेब माननीय साहेब पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पो-लीस स्टेशनची वरिष्ठ पो-लीस निरीक्षक टी वाय मुजावर सहाय्यक पोलीस निरीक्षक शहाजी गोसावी अक्षय सोनवणे पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय, विक्रम बडने एएसआय आबा शेंडगे पोलीस आमदार सुहास देशमुख, दीपक मंगेश रोकडे, अभिमन्यू गरड, भोसले सचिन गावडे, सागर गवळी पोलीस चालक रामभाऊ चाटे, हसन नदाब व गोडसे यांच्या पथकाने केली.

# जितेंद्र बनसोडे यांचा रिपाइं अक्कलकोट तालुक्याच्या वतीने सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस जितेंद्र बनसोडे यांची सोलापूर जिल्हा दक्षता समिती सदस्य पदी निवड झाल्याबद्दल रिपाई अक्कलकोट तालुक्याच्या वतीने सत्कार करण्यात आले यावेळी रिपाई अक्कलकोट तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक अविनाश मडिखांबे, जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, युवक



तालुका अध्यक्ष अप्पा भालेराव, तालुका उपाध्यक्ष अंबादास गायकवाड, शुभम मडिखांबे, मडिवेळेशोर कट्टीमानी, संदेश माने, सचिन बर्गाली आदी उपस्थित होते

# डॉ. विशाल गायकवाड यांची सिंहगड संस्थेच्या डायरेक्टरपदी नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन अँड रिसर्च पुणे संस्थेच्या डायरेक्टर पदी डॉ विशाल बी गायकवाड यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यांच्या नियुक्तीमुळे शैक्षणिक क्षेत्रात व संस्थेमध्ये आनंदाचे वातावरण असून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव केला आहे.

डायरेक्टर पदाची जबाबदारी



स्वीकारताना डॉ गायकवाड यांनी शैक्षणिक क्षेत्रात संस्थेचे नाव उज्वल करून विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान, संगणक, कौशल्य विकास, संशोधन , सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी उपलब्ध करून देऊन संस्थेचा नावलौकिक करणार असल्याचे सांगितले.

डॉ गायकवाड यांनी अनेक गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन केले आहे. सामाजिक व धम्मकार्यात त्यांचे बहुमूल्य योगदान आहे.

डॉ गायकवाड यांच्या नियुक्ती बद्दल त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी व विद्यार्थी संघटनांनी पुढील कारकीर्दीसाठी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# खासदार धनंजय महाडिक यांच्या पोस्टरवरून सुस्ते येथे दोन गटात हाणामारी गावात तणावाचे वातावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : खा-सदार धनंजय मुंडे यांच्या सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल केल्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये हाणामारी झाली तीन ते चार दोन जखमी झाले. त्यांच्यावर सोलापूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गावामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिवसापूर्वी सृष्टी येथे यात्रेत राधा पाटील यांचा नृत्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमांमध्ये ही गोंधळ करून दोन गटांमध्ये हाणामारी करण्यात आली. त्यामुळे गा-वातून तीव्र संताप व्यक्त केला करण्यात आला होता.

यानंतर काही दिवस-ातच खासदार धनंजय महाडिक यांचा सोशल मीडियावर पोस्टर वायरल करून यावरील वाद निर्माण दोन गटांमध्ये हाणामारी करण्यात आली. दहा दहा क्षेत्राचा व स्प्रे चा वापर करण्यात आला होता. त्यामुळे सुमारे तीन ते चार जण जखमी झाल्या असून सोलापूर येथील खा-जगी रुग्णालयामध्ये उपचार घेत आहे. घटनेची माहिती मिळतात पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस तात्काळ दाखल झाले व वातावरण शांतता निर्माण केली व गावांमध्ये तणवचे वातावरण निर्माण झालेली आहे. पंढरपूर पोलिसांनी सदर गुन्हा मधील गुन्हा दाखल करण्याची काम सुरू आहे.

## अनिल तावरखेड यांच केले आमदार तोडभरून कौतुक

# गोगांव ग्रामस्थ वतीने आ. योगेश टिळेकर यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सोलापूर जिल्हाचे भाजपा प्रभारी आमदार योगेश टिळेकर यांनी गोगांव गावास धावती भेट दिले यावेळी श्री कलेश्वर देवस्थानाचे भक्ती भावाने संपूर्ण कुटूंब दर्शन घेतले.

सत्कार कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप हे होते व्यासपीठावर संध्या ताई टिळेकर, हरीश शेठ टिळेकर, गोकुळ बरकडे, संभाजी भांगरे, सु-धीर लोखंडे, सूर्यकांत लोखंडे, विराज टिळेकर यासह मान्यवर उपस्थित होते आमदार योगेश टिळेकर स्वपत्नीक श्री कलेश्वर देवस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आले.

यावेळी भाजपाचे जेष्ठ नेते कल्याणराव बिराजदार व उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी मनोगत व्यक्त केले.

सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या मनात आपलेपणाची जागा निर्माण करणारे नेतृत्व म्हणजे योगेश भाऊ टिळेकर होय. , पण योगेशभाऊ आजही कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे, त्यांच्या हाकेला तत्परते-





ने धावून जाणारे आणि प्रत्येकाला आपलंसं वाटणारं नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

एक सर्वसामान्य कार्यकर्त्याचा शब्द जपणं, त्याच्या भावनांना मान देणं आणि छोट्या छोट्या भेटीतूनही माणुसकी जपणं ही योगेशभाऊंची खासियत आहे. चहाच्या एका साध्या कपातूनही त्यांनी कार्यकर्त्यांच्या मनात गोडवा निर्माण केला. कार्यकर्त्यांनी प्रेमाने दिलेल्या निमंत्रणाला प्रतिसाद देत त्यांनी साधेपणाने उपस्थित राहून प्रत्येकाच्या भावना जपल्या. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये आपला माणूस अशी त्यांची ओळख अधिक मजबूत झाली आहे.

योगेशभाऊंच्या नेतृत्वात दिखावा नाही, तर आत्मीयता आहे. सामान्य लोकांमध्ये मिसळून राहणे, प्रत्येकाशी हसतमुखाने संवाद साधणे आणि कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान सन्मान देणे ही त्यांची कार्यपद्धती अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. कार्यकर्त्यांचा शब्द पाळणारे आणि त्यांच्या मान-सन्मानाची जाणीव ठेवणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

आजच्या राजकारणात माणुसकी, साधेपणा आणि कार्यकर्त्यांवरील प्रेम जपणारे नेते फार कमी पाहायला मिळतात. पण योगेशभाऊ टिळेकर यांनी आपल्या कामातून आणि स्वभावातून हे सिद्ध केले आहे की, खरा नेता तोच जो लोकांच्या मनात राहतो. चाय पे चर्चा माध्यमातून चहाच्या गोडीसोबत कार्यकर्त्यांची मनं जिंकणारे आणि प्रत्येक सामान्य माणसाला आपलेसे वाटणारे हे नेतृत्व निश्चितच अनेक तरुण कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्थान असतो.

**आमदार योगेश टिळेकर यांचे गाडीचे चालक अनिल तावरखेड यांची मुळगाव चालकाच्या आग्रहास्तव गोगांव येथे भेट देऊन श्री कलेश्वर महाराज यांची सह कुटुब दर्शन घेतले व नंतर चालक यांच्या घरी जाऊन त्याच्या आई वडील आजी यांचे विठ्ठल रुक्मिणी मूर्ती भेट देऊन सत्कार केले.**

यावेळी बोलताना आमदार टिळेकर म्हणाले की आज गोगांव ग्रामस्थांनी दिलेले सन्मान सत्कार मी स्वीकारतो आपल्या गावाच्या विकासासाठी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी कटिबद्ध आहेतच त्याच्या नेतृत्वाखाली विकास कामे मोठ्या प्रमाणात चालू आहे आपल्याकडून ही विकासासाठी निधी देण्याचं प्रयत्न करू असे म्हणाले.

यावेळी अनिल मुलगे, बाबुराव बिराजदार, कल्लप्पा पाटील, मलिनाथ बिराजदार कल्लपा वाडे, पंडित मुळजे,शरणपा मुळजे, सिद्धाराम तावरखेड, यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन कमलाकर सोनकांबळे यांनी केले आभार प्रमोद होळे यांनी मानले.

# संजय मामा शिंदे यांच्या प्रयत्नातून श्री महादेव मंदिर विकासासाठी तब्बल २.४९ कोटींचा निधी मंजूर

## चिंचगाव येथील ग्रामीण यात्रा स्थळांचा होणार विकास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा तालुक्यातील चिंचगाव येथील श्री महादेव मंदिर या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना बवर्ग अंतर्गत विविध विकास कामांसाठी राज्य शासनाने तब्बल दोन कोटी ४९ लाख ९९४०३ रुपयांचा निधीत प्रशासकीय मान्यता दिली आहे. माजी आमदार संजय मामा शिंदे यांच्या प्रयत्नातून ही प्रशासकीय मान्यता मिळाली आहे यामुळे यात्रा स्थळांच्या विकासाला मोठी चालना मिळणार



आहे.

प्रधान सचिव ग्रामविकास यांच्या अध्यक्षतेखाली ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या राज्य निकष समितीच्या बैठकीत संबंधित प्रस्तावावर चर्चा करण्यात आली होती विकास कामाची अंदाजपत्रके व आवश्यक कागदपत्रांची तपासणी करून समितीने निधीस मान्यता देण्याची शिफारस केली आहे त्यानुसार शासनाने सण २०२६/२७ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय निधीतून या कामांना मंजुरी दिली आहे.

मंजूर करण्यात आलेल्या कामांमध्ये पह१४५ ते सत्संग आश्रम महादेव टेकडी चिंचगाव रोड पर्यंत रस्ता सुधारणा करण्यासाठी ९९ लाख ९९ हजार ४२७ रुपये सत्संग आश्रम परिसरात कॉंक्रीटिव्ह डांबरीकरणासाठी ९९ लाख ९९९७६ तसेच संरक्षण भिंत बांधण्यासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या विकासामुळे यात्रेकरूंना सुविधा उपलब्ध होणार असून परिसराची सुशोभीकरण आणि सुरक्षितते तेही वाढ होणार आहे विकास कामासाठी माजी आमदार संजय मामा शिंदे यांनी पाठपुरावा केला होता स्थानिक नागरिकाकडून शासनाच्या या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

# पत्रकार औटी यांच्या परिवाराला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची सांत्वन भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जुन्नर : पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील राजुरी येथील पत्रकार चंद्रकांत सुदाम औटी यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे पत्रकारिता क्षेत्रासह परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे व प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी यांच्या सूचनेनुसार, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख सुभाष डोके तसेच जुन्नर तालुका अध्यक्ष नयन डुंबरे यांनी आवटी यांच्या परिवाराची सांत्वन भेट घेतली.

यावेळी उप-स्थित मान्यवरांनी पत्रकार औटी यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून आणि सहकार चळवळीद्वारे सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने काम केले. आपल्या प्रभावी लिखाणातून त्यांनी समाजातील अनेक प्रश्नांना वाचा फोडली आणि लोकहिताचे कार्य केले.

तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने औटी यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत व किराणा साहित्य देऊन आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आपल्या पत्रकार बांधवांच्या कुटुंबाच्या पाठीशी कायम उभा आहे. परिवारावर कोणतीही अडचण किंवा प्रश्न निर्माण झाल्यास पत्रकार संघ नेहमी मदतीसाठी तत्पर राहील.

या भेटीद्वारे पत्रकार बांधवांमधील एकोपा, सामाजिक बांधिलकी आणि पत्रकार कुटुंबाप्रती असलेली संवेदनशीलता पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

# सर्व नोडल अधिकाऱ्यांनी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी : सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदारसंघ निवडणूकचा कार्यक्रम १८ मे २०२६ रोजी जाहीर झालेला आहे. या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात निवडणूक कामकाजासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या आदेशान्वये नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

निवडणुकीदरम्यान सर्व कामकाज पारदर्शक व सुरळीत पार पडावे यासाठी आवश्यक ती जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्या जबाबदारीची सविस्तर माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहाय्यक




निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत पाटील यांनी देऊन सर्व नोडल अधिकाऱ्यांनी परस्परात समन्वय ठेवून काटेकोरपणे कामे करावीत, असे आवाहन केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित विधान परिषद निवडणूक नोडल अधिकारी आढावा बैठकीत श्री. पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, पोलीस उपयुक्त अश्विनी पाटील, समाज कल्याण च्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त विना पवार, जिल्हा प्रशासनाधिकारी नगरपालिका योगेश डोके, जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी रवी पवार, तहसीलदार दिनेश पारगे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### सोलापूर जिल्ह्यात विधान परिषद निवडणुकीसाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती

निवडणुकीदरम्यान मनुष्यबळ व्यवस्थापन, प्रशिक्षण, साहित्य, वाहतूक, सायबर सुरक्षा, डतएएझ योजना, कायदा व सुव्यवस्था, आचारसंहिता पालन, खर्च निरीक्षण, मतपत्रिका व पोस्टल बॅलेट, माध्यम व्यवस्थापन, तक्रार निवारण, निरीक्षक समन्वय, दिव्यांग मतदार सुविधा, एएमएफ, स्ट्रॉंग रूम व मतमोजणी केंद्र, सीमा व्यवस्थापन, दारू नियंत्रण, अन्न व्यवस्थापन, वन विंडो प्रणाली, जिल्हा नियंत्रण केंद्र, सूक्ष्म निरीक्षक, सोशल मीडिया निरीक्षण व वैद्यकीय सुविधा अशा २८ क्षेत्रांसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत, असे श्री. पाटील यांनी सांगून सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांना दिलेल्या जबाबदाऱ्याची माहिती दिली.

# 'लाईव्ह इव्हेंट्स' च्या परवानग्यांसाठी 'एक खिडकी' व्यवस्था तयार करण्यात येणार : प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील 'लाईव्ह इव्हेंट' क्षेत्राला चालना देण्यासाठी एक खिडकी योजनेच्या माध्यमातून सर्व परवानग्या मिळण्याची सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. यासाठी शासनाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे. लाईव्ह इव्हेंट संदर्भातील सर्व परवानग्यांसाठी तयार करण्यात येणाऱ्या एसओपी करिता (सर्वसमावेशक विशिष्ट कार्यपद्धती) संबंधित विभागांनी सूचना द्याव्यात आणि सहकार्य करावे, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

लाइव्ह इव्हेंट क्षेत्राला विकास आणि प्रोत्साहन देण्यासाठी, २४ एप्रिल २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार गठीत राज्यस्तरीय समितीच्या पहिल्या बैठकीत प्रधान सचिव सिंह बोलत होते. मंत्रालयातील परिषद सभागृहात ही बैठक झाली. बैठकीस महाआयटी आयुक्त भुवनेश्वरी बी, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) प्रवीण साळुंखे, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, पोलीस उपायुक्त अकबर पठाण आदी उपस्थित होते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (प्रशासन) किशोर गांगुर्डे यांनी प्रास्ताविकेतून लाईव्ह इव्हेंटसाठी करण्यात येणाऱ्या एसओपीची बैठकीत माहिती दिली.

# वागदरी येथे विधानपरिषद आ. योगेशभाऊ टिळेकर यांनी हॉटेल महादेव रेस्टॉरंट येथे सदिच्छा भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : एक सर्वसामान्य कार्यकर्त्याचा शब्द जपणं, त्याच्या भावनांना मान देणं आणि छोट्या छोट्या भेटीतूनही माणुसकी जपणं ही योगेशभाऊंची खासियत आहे. चहाच्या एका साध्या कपातूनही त्यांनी कार्यकर्त्यांच्या मनात गोडवा निर्माण केला. कार्यकर्त्यांनी प्रेमाने दिलेल्या निमंत्रणाला प्रतिसाद देत त्यांनी साधेपणाने उपस्थित राहून प्रत्येकाच्या भावना जपल्या. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये आपला माणूस अशी त्यांची ओळख अधिक मजबूत झाली आहे.

योगेशभाऊंच्या नेतृत्वात दिखावा नाही, तर आत्मीयता आहे. सामान्य लोकांमध्ये मिसळून राहणे, प्रत्येकाशी हसतमुखाने संवाद साधणे आणि कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान सन्मान देणे ही त्यांची कार्यपद्धती अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. कार्यकर्त्यांचा शब्द पाळणारे आणि त्यांच्या मान-सन्मानाची जाणीव ठेवणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

आजच्या राजकारणात माणुसकी, साधेपणा आणि कार्यकर्त्यांवरील प्रेम जपणारे नेते फार कमी पाहायला मिळतात. पण योगेशभाऊ टिळेकर यांनी आपल्या कामातून आणि स्वभावातून हे सिद्ध केले आहे की, खरा नेता तोच जो लोकांच्या मनात राहतो.

### वागदरी येथे आमदार योगेश टिळेकर यांच सत्कार

चाय पे चर्चा माध्यमातून चहाच्या गोडीसोबत कार्यकर्त्यांची मनं जिंकणारे आणि प्रत्येक सामान्य माणसाला आपलेसे वाटणारे हे नेतृत्व निश्चितच अनेक तरुण कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्थान आहे.

देत चाय पे चर्चा माध्यमातून स्थानिक नागरिक, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांशी मनमोकळा संवाद साधला. त्यांच्या साध्या, मनमिळावू स्वभावामुळे उपस्थित नागरिकांनी त्यांचे मोठ्या आत्मीयतेने स्वागत केले.

हॉटेल महादेव रेस्टॉरंट येथे अनेक कार्यकर्ते, मित्रपरिवार व ग्रामस्थ उपस्थित होते.ही धावती भेट अल्प वेळाची असली तरी कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक ठरली. साहेबांच्या भेटीमुळे वागदारी परिसरातील राजकीय आणि सामाजिक वातावरणात नवचैतन्य



निर्माण झाले असून कार्यकर्त्यांमध्ये नव्या उर्जेचा संचार झाला आहे.त्यावेळी वागदरीचे माजी सरपंच रविकिरण वरनाळे,आ.सचिनदादा कल्याणशेट्टी यांचे कट्टर समर्थक संतोष पोमाजी, युवा उद्योजक प्रकाश पोमाजी, ज्येष्ठ नेते बसवराज पाटील,सुंदर काळे,गोगावचे उपसरपंच कमलाकर सोनाकांबळे , इसाईल नदाफ, कल्याणराव बिराजदार, आणि गावातील सर्व भाजपा कार्यकर्ते व नेते उपस्थिती होते.

## मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम; जिल्ह्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी

# जिल्ह्यातील कोणत्याही पात्र नागरिकांचे नाव मतदार यादीतून वगळू नये

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, :- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण देशासह महाराष्ट्र राज्यातही मतदार यादींच्या अचूकतेसाठी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणे, चुकीची नोंद दुरुस्त करणे तसेच अपात्र नावे वगळणे असा आहे. तरी या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांनी कोणत्याही पात्र मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळले जाणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केले.

प्रारंभी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी एस. कार्तीकेयन यांनी पीपीटीद्वारे सादरीकरण केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विशेष सखोल




पुनरिक्षण कार्यक्रम आढावा प्रसंगी श्री. चोक्कलिंगम मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत पाटील, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, यांच्या सह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

मुख्य निवडणूक अधिकारी श्री. चोक्कलिंगम पुढे म्हणाले की, या अंतर्गत केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी (इङज) घर भेटी मध्ये नागरिकांना गणना फॉर्म दिल्यानंतर तो त्यांच्याकडून लगेच भरून घ्यावा. नागरिकांनी सोबत आवश्यक पुरावे दिल्यास तेही घ्यावेत. मतदार यादीतील नावात विसंगती असेल तसेच अविवाहित मतदार असतील अशा ठिकाणी डॉक्युमेंट आवश्यक आहेत. बीएलओ व सुपरवायझर यांचे व्यवस्थित प्रशिक्षण मतदार अधिकाऱ्यांनी घेतले पाहिजे. तसेच बीएलओ नी नागरिकांच्या घरोघरी भेटी देत असताना त्यांच्याशी व्यवस्थितपणे बोलून मतदार यादी गणना माहिती सांगावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

काही ठिकाणी मतदार यादीतील मतदारांचे पत्ते एकाच ठिकाणावर असल्याचे निर्देशनास आलेले आहे, त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या अंतर्गत प्रत्येक घराचे नंबरिंग यंत्रणेकडून करून घ्यावे. मतदार यादीतील दुरुस्तीसाठी प्रत्येक बीएलओ यांच्याकडे ब्लॅक इमरेशन फॉर्म ठेवा. नव्याने अठरा वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांचे मतदार यादीत नोंद करून घ्या. तसेच ज्या ठिकाणी मॅपिंग कमी झालेले आहे अशा ठिकाणी लक्ष ठेवावे व त्या ठिकाणी कामाची गती वाढवावी, अशा सूचना श्री. चोक्कलिंगम यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. कार्तीकेयन म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात मतदार यादींच्या अचूकतेसाठी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबवला जात आहे. जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांची संख्या ११असून लोकसभा मतदारसंघ २ आहेत (सोलापूर (डउ) व माढा). एकूण मतदारसंख्या ३९ लाख ४६ हजार ७८१ असून त्यात पुरुष वीस लाख दहा हजार ९४८, महिला १९ लाख पस्तीस हजार पाचशे पाच व इतर ३२८ मतदारांचा समावेश आहे. जिल्ह्यात ३७२३ मतदान केंद्रे कार्यरत असल्याची माहिती त्यांनी दिली.

जिल्ह्यात एकूण ७७ हजार ८६ ब्लर फोटो व चुकीच्या नोंदी प्रकरणांपैकी ७२ हजार ६४८ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. उर्वरित प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. जिल्ह्याच्या एकूण मतदार संख्येच्या ३२ लाख ८३ हजार ८११ मतदारांचे सखोल पुनरीक्षण झालेले आहे. सरासरी प्रमाण ८३.२०% इतके आहे.ग्रामीण भागात नोंदणी टक्केवारी ८७.२०% असून शहरी भागात ७२.६७% आहे. ग्रामीण भागात इङज व सहाय्यक अधिकाऱ्यांनी समाधानकारक कामगिरी केली असून शहरी भागात अधिक लक्ष देऊन हे प्रमाणही वाढविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी श्री. कार्तीकेयन यांनी सांगितले.

महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदार संघ साठीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला असून या अनुषंगाने जिल्ह्यात ६१६ मतदार आहेत. दिनांक २५ मे ते २ जून या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयात नामनिर्देशन अर्ज स्वीकारले जाणार असून सहा ठिकाणी मतदान केंद्रे तर नियोजन भवन येथे मतमोजणी होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी श्री. कार्तीकेयन यांनी दिली.

मुख्य निवडणूक अधिकारी श्री. चोक्कलिंगम यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील एकाही पात्र नागरिकांचे मतदार यादीतून नाव वगळले जाणार नाही, असे आश्वासन प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी दिल